**आजचा शुभ विचार**

“"बुद्धिमत्तेचा विकास हे मानवी अस्तित्वाचे अंतिम लक्ष्य असले पाहिजे"आपण नेहमी काहीतरी शिकत राहिले पाहिजे. आपले ज्ञान वाढविण्यावर भर दिला पाहिजे"

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!






मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-15 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thurseday 15 May 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक १५ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ गुरुवार, दि. १५ मे २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


# खिशातील चुरगळलेल्या कागदावरील क्रमांकावरुन मारेकऱ्यांचा तपास;

## धुळे तालुक्यातील हत्या प्रकरणी विधीसंघर्षित बालकासह तिघांना अटक

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------------



मयताच्या सदऱ्याच्या खिशातील चुरगळलेल्या कागदावर लिहिलेल्या शेवटच्या दोन भ्रमणध्वनी क्रमांकावरुन कौशल्याने थाळनेर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेने हत्येप्रकरणी संयुक्तपणे तपास करुन विधीसंघर्षित बालकासह तीन जणांना अटक केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार थाळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत शिरपूर-गरताड रस्त्यावर पाच मे रोजी एक मृतदेह आढळला. प्राथमिक पाहणीत मारहाण करुन रुमालाने गळा आवळल्याचे निदर्शनास आले. संबधिताची हत्या करुन मृतदेह शेतात टाकून मारेकरी पळून गेले होते. या प्रकरणी थाळनेर पोलीस ठाण्यात प्रथमदर्शी अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली. मृतदेह सापडल्यापासून गुन्ह्याबाबत कोणतीही माहिती मिळत नव्हती. नऊ मे रोजी तपास अधिकारी सहायक निरीक्षक शत्रुघ्न पाटील यांनी मयताच्या अंगावरील जप्त कपड्यांची तपासणी केली असता सदऱ्याच्या खिशात कागदाचे तुकडे झालेली चिट्टी मिळाली. या चिठ्ठीवर असलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकातील शेवटचे दोन अंक जुळविण्यासाठी विशेष प्रयत्न केले. शेवटचा अंक ५६ असल्याची खात्री झाल्यावर त्या क्रमांकाची तांत्रिक तपासणी करण्यात आली. संबंधित क्रमांकाचा भ्रमणध्वनी संजय कनोज (हल्ली मुक्काम ब्राम्हणे, ता. शिंदखेडा) हा वापरत असल्याचे उघड झाले. त्याच्याकडे तपास केल्यावर संबंधित भ्रमणध्वनी क्रमांक त्याचा पुतण्या दयाराम कनोज याचा असल्याचे कळाले. दयाराम हा मध्य प्रदेशातील बडवानी जिल्ह्यात झरीमाता येथे गेल्याचे समजल्यावर थाळनेर पोलीस आणि गुन्हे शाखेतील कर्मचारी असे पथक मध्य प्रदेशात पोहचले. तेथील दोघांना मृताचे छायाचित्र दाखविले असता त्यांनी संबंधित व्यक्ती हा त्यांचा पाहुणा उमेश ऊर्फ राहुल चौहान ( रा. उपला, जि.बडवानी, मध्य प्रदेश, हल्ली मुक्काम मधुकर चित्र मंदीरजवळ, नरडाणा, जळगाव हा असल्याची माहिती पोलिसांना दिली.

नंतर पोलिसांनी १२ मे रोजी नरडाणा गावातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमधील चित्रण तपासले असता आकाश पावरा हा मयत उमेश चौहान बरोबर असल्याचे दिसले. शिरपूर तालुक्यातील निमझरी रोड येथून आकाश यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता साथीदार दिलीप पावरा, घनदास ऊर्फ गुड्ड पावरा आणि लहान भाऊ विधीसंघर्षीत बालक यांनी एकत्र येऊन उमेश ऊर्फ राहुल याची हत्या केल्याचे सांगितले. पोलिसांनी दिलीप पावरा आणि विधीसंघर्षित बालक यांना नरडाणा येथून तर घनदास यास मध्य प्रदेशातील बडवानी जिल्ह्यातील भुरापाणी येथून ताब्यात घेतले. उमेश ऊर्फ राहुलने विधीसंघर्षीत बालकास शेतात मजूर पाठविण्याच्या कारणावरुन मारहाण केली होती. तर, घनदास ऊर्फ गुड्डु यास जुन्या भांडणाच्या वादातून महिन्यापूर्वी नरडाणा येथील घरात घुसुन मारहाण केली होती, या घटनांचा बदला म्हणून घनदास ऊर्फ गुड्डु जाधव-पावरा (३६), दिलीप पावरा (२१), आकाश पावरा (१९) आणि १७ वर्षाच्या विधीसंघर्षीत बालकास (सर्व रा.नरडाणा,.शिंदखेडा) यांनी चार मे रोजी रात्री उमेश याची हत्या करण्याचा कट रचला. त्यानंतर आकाशने उमेश यास नरडाण्याहून मध्यरात्री शिरपूर येथे आणले. दिलीप, विधीसंघर्षीत बालक हे घनदास ऊर्फ गुड्डु याच्याबरोबर मोटार सायकलने शिरपूर येथे आले. गरताड रोडवरील हॉटेल सनी गार्डनपुढे रस्त्यालगत शेतात उमेश यास मारहाण करण्यात आली. रुमालाने गळा आवळून त्याची हत्या करण्यात आली. त्यास शेतात फेकून मारेकऱ्यांनी पळ काढला.याप्रकरणी पोलिसांनी संशयितांना नरडाणा आणि मध्य प्रदेशातून ताब्यात घेतले. विधीसंघर्षीत बालकाच्या वयाची तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे

# राजशिष्टाचार मोडल्याने दोन तलाठी निलंबित, तर अप्पर जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय महसूल अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

सुनील बाचरे
अंबरनाथ प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सिंधुदुर्ग दौऱ्यात राजशिष्टाचाराचे उल्लंघन झाल्याने जिल्हा प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. दौऱ्यावेळी राजशिष्टाचार न पाळल्याने दोन तलाठ्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच, सुरक्षेतील त्रुटी आणि नियंत्रण योग्यरित्या न ठेवल्याबद्दल अप्पर जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय महसूल अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

### दोन तलाठी निलंबित:

सहाय्यक महसूल अधिकारी एस. पी. हांगे आणि ग्राम महसूल अधिकारी व्ही. व्ही. कंठाळे या दोघांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दौऱ्यावेळी राजशिष्टाचार पाळला नाही. त्यांना मुख्यालयात राहण्याचे आदेश असतानाही त्यांनी आदेशाचे उल्लंघन केले आणि मुख्यमंत्र्यांच्या भेटीला गेले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या पूजन आणि दर्शनासाठी आलेल्या मुख्यमंत्र्यांची या दोन्ही अधिकाऱ्यांनी भेट घेतली होती. यावर ठाकरे शिवसेनेचे माजी आमदार वैभव नाईक यांनी नाराजी व्यक्त करत लाचलुचपत प्रतिबंधक कारवाई झालेल्या या दोघांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार केला असा आरोप केला होता. तसेच मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात तक्रार केली होती.यानंतर जिल्हाधिकारी अनिल पाटील यांनी दोघा तलाठ्यांना निलंबित केले.

### अप्पर जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय महसूल अधिकाऱ्यांना नोटीस:

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सिंधुदुर्ग दौऱ्यात सुरक्षेमध्ये त्रुटी राहिल्याबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक, तसेच नियंत्रण योग्यरित्या न ठेवल्याबद्दल अप्पर जिल्हाधिकारी रवी पाटील आणि कणकवली प्रांताधिकारी जगदीश काकतकर यांना जिल्हाधिकारी अनिल पाटील यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यांना तात्काळ खुलासा करण्याचे आदेश दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सिंधुदुर्ग दौऱ्यात मालवण राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन आणि कणकवली करंजे येथे गोवर्धन शाळेचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमांदरम्यान तलाठी एस. पी. हांगे आणि व्ही. व्ही. कंठाळे हे राजशिष्टाचार न पाळता आणि मुख्यालय सोडण्याचे आदेश असतानाही मालवण कार्यक्रमात पोहोचले व मुख्यमंत्र्यांच्या स्वागताला गेले. यावरून माजी आमदार वैभव नाईक यांनी लाचखोरी तलाठ्यांकडून मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला, अशी टीका केली होती.

मुख्यमंत्र्यांच्या झेड प्लस सुरक्षा असताना तलाठ्यांना कार्यक्रमाला जाण्याची परवानगी कशी दिली, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. त्यामुळे सुरक्षेमध्ये त्रुटी राहिल्याबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. मालवण कार्यक्रमाला अप्पर जिल्हाधिकारी रवी पाटील यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनीही नियंत्रणाची जबाबदारी न पडल्याने त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच, कणकवली तालुक्यातील करंजेच्या कार्यक्रमाची जबाबदारी कणकवली प्रांताधिकारी जगदीश काकतकर यांच्यावर होती. त्यांनीही नियंत्रणाची जबाबदारी पार पाडली नसल्याने त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे.

# किराणा हिल्सवर हल्ला? भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तानात अणुऊर्जेचा गूढ गोंधळ!

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तानात एक वेगळाच गोंधळ सुरू झाला आहे. सोशल मीडियावर जोरदार चर्चा आहे की भारताने पाकिस्तानच्या संवेदनशील अण्वस्त्र साठ्यावर हल्ला केला आणि त्यानंतर तिथे न्यूक्लिअर रेडिएशन लीक झालं आहे. ही माहिती अजून अधिकृतरीत्या सिद्ध झालेली नसली तरी अमेरिकेनेही या चर्चेकडे दुर्लक्ष केलेलं नाही. १० मे रोजी भारताने पाकव्याप्त काश्मीरसह पाकिस्तानातील ८ पेक्षा अधिक एअरबेसवर लक्ष केंद्रीत करून जोरदार हवाई कारवाई केली. यात सरगोधा, नूर खान, पसरूर, सियालकोट, रहीम यार खान, रडार सेंटर, कमांड अँड कंट्रोल युनिट यांचा समावेश होता. सॅटेलाईट फोटोंवरून या हल्ल्यांचं प्रमाण स्पष्टपणे दिसून येतंय. मात्र या कारवाईनंतर सर्वाधिक चर्चेत आलं ते म्हणजे किराणा हिल्स. हा भाग पाकिस्तानच्या अण्वस्त्र साठ्यासाठी प्रसिद्ध असून, हाच परिसर भारताच्या हल्ल्याचं लक्ष्य ठरला, असा सोशल मीडियावर दावा करण्यात येत आहे. यातूनच तिथे अणु किरणोत्सर्ग झाला असल्याचंही बोललं जातंय. या चर्चेनंतर अमेरिकेने रेडिएशन डिटेक्शन विमान पाकिस्तानमध्ये पाठवलं असल्याचंही काही मीडिया रिपोर्ट्समध्ये नमूद करण्यात आलं. मात्र अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने या संपूर्ण प्रकरणावर सध्या कोणतंही भाष्य करण्यास नकार दिला आहे. भारतीय वायुदलाचे एअर मार्शल ए. के. भारती यांनी पत्रकार परिषदेत या दाव्यांना फेटाळून लावलं. "किराणा हिल्समध्ये अण्वस्त्र आहेत हे सांगितल्याबद्दल पाकिस्तानचे आभार," असं ते मिश्कीलपणे म्हणाले. "आम्हाला याची आधी कल्पना नव्हती." विशेष म्हणजे, पाकिस्तानकडूनही अद्याप आंतरराष्ट्रीय अणु संस्थेकडे कुठल्याही प्रकारची चौकशी मागवलेली नाही. त्यामुळे सोशल मीडियावर सुरू असलेली रेडिएशन लीकची चर्चा अफवाच असण्याची शक्यता तज्ज्ञांकडून वर्तवली जात आहे. पाकिस्तानच्या अणु कार्यक्रमाच्या सुरक्षेवर नेहमी प्रश्नचिन्ह असले तरी यावेळी या चर्चेने पुन्हा एकदा जागतिक लक्ष तिकडे वळवले आहे. भारताच्या शांततेच्या संदेशामागे लपलेली सामर्थ्याची ताकद पुन्हा एकदा जगासमोर ठसठशीतपणे उभी राहिली आहे.

# महाराष्ट्र राज्याच्या शिरेपेचात अजून एक मानाचा तुरा

## अमरावतीचे न्यायमूर्ती बी. आर. गवई बनले देशाचे 52 वे सरन्यायाधीश!

प्रवीण उंबरकर
अमरावती प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------



मूळचे महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील न्यायमूर्ती भूषण गवई यांनी भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली आहे. संपूर्ण महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. ते सरन्यायाधीश संजीव खन्ना यांचे उत्तराधिकारी म्हणून सरन्यायाधीश पदावर रुजू होत आहेत. न्यायमूर्ती भूषण गवई हे अनुसुचित जाती वर्गातील दुसरे सरन्यायाधीश देशाला लाभले आहेत. तसेच ते पहिले बौद्ध सरन्यायाधीश असल्याने भारतीय न्यायव्यवस्थेच्या व्यापक आणि सर्वसमावेशकतेच्या दृष्टीकोनातून त्यांची नियुक्ती महत्वाची मानली जाते. राष्ट्रपती भवनात बी आर गवईंचा शपथविधी सोहळा पार पडला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी बी आर गवईंना सरन्यायाधीश पदाची शपथ दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या प्रमुख उपस्थितीत हा शपथविधी सोहळा पार पडला. संविधानाच्या कलम १२४(२) अंतर्गत गवईंचे नियुक्तीपत्रक काढण्यात आले, ज्यावर राष्ट्रपतींनी शिक्कामोर्तब करत त्यांच्या नियुक्तीला मान्यता दिली.

### न्यायमूर्ती भूषण गवई यांचा कार्यकाळ

न्यायमूर्ती भूषण गवई मे २०१९ पासून सर्वोच्च न्यायालयात रुजू झाल्यापासूनच, देशासाठी प्रमुख निर्णयांत महत्वाची भूमिका बजावत आहेत. गेल्या ६ वर्षांत ते ७०० खंडपीठांत सहभागी होते. ज्यामधून त्यांनी जवळपास ३०० निर्णय घेतले. त्यांनी प्रशासकीय, दिवाणी, फौजदारी, व्यावसायिक आणि पर्यावरणीय कायद्यांसाठी उल्लेखनीय निर्णय घेतले आहेत.


अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर, जाहिरात प्रतिनिधी, गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

संपादकीय

# शस्त्रसंधी म्हणजे युध्दविराम नव्हे...

ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांची ९ ठिकाणे उद्ध्वस्त केली. यापुढेही भारत कारवाई करण्यासाठी मागेपुढे पाहणार नाही असा इशारा पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. देशवासीयांना संबोधित करताना ते एवढे बोलून थांबले नाही, तर यापुढे दहशतवाद आणि व्यापार एकाचवेळी चालणार नाही, पाणी आणि रक्त एकत्र वाहणार नाही. त्यामुळे पाकिस्तानसोबत चर्चा झाली, तर फक्त पाकव्याप्त काश्मीरवर आणि दहशतवादावरच होणार असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले. दोन्ही देशांच्या समन्वयाने शस्त्रसंधी झाल्याने भारताकडून ऑपरेशन सिंदूर तूर्त स्थगित करण्यात आले असले तरी, पाकिस्तानकडून कुरघोडी झाल्या, तर ते पुन्हा सुरू करण्यात येईल, असे पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट करून, पाकिस्तानला एकप्रकारे इशारा दिला आहे. पहलगाम हल्ल्यात २६ निरपराधांचा बळी गेला. त्यामुळे भारताने शंभरहून पाकिस्तानी दहशतवाद्यांचा खात्मा केला. तसेच, पाकिस्तानचे ४०० हून अधिक ड्रोन हल्ले भारताने परतवले. भारतीय सैन्याकडून तीन दिवसांत केलेल्या कारवाईमुळे पाकिस्तानची भंबेरी उडाली होती. भारताने असे हल्ले सुरू ठेवले, तर पाकिस्तान हा देश जगाच्या नकाशांवर राहील का अशी भीती पाकिस्तानी जनतेच्या मनात निर्माण झाली होती. या भयातून पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी अमेरिका, चीनसह जगातील अन्य देशांकडे मदतीचा हात मागितला. चीन आणि तुर्कीस्तान वगळता कोणीही पाकिस्तानला पाठिंबा दिला नव्हता. मात्र जगात युद्ध नको म्हणून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तानने शस्त्रसंधी करावी असा प्रस्ताव पुढे आणला. या प्रस्तावाला भारताने सहमती दर्शवली, याचा अर्थ अमेरिकेपुढे लोटांगण घातले असा प्रचार काही मोदी द्वेष्ट्यांनी सुरू केला; परंतु त्यात काही तथ्य नव्हते. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून दहशतवाद्यांची पाळेमुळे खणून, त्याचे कंबरडे मोडणे हा भारताचा मुख्य हेतू होता. पाकिस्तानातील सर्वसामान्य नागरिकांना धोका पोहोचेल अशी कोणतीही कृती भारतीय लष्कराने केली नव्हती. त्यामुळे, शस्त्रसंधीचा पर्याय पाकिस्तानातील डीजीएमओमधील अधिकाऱ्यांमार्फत आल्यानंतर, आपल्या लष्कराने शांततेचा मार्ग स्वीकारण्याचा घेतलेला निर्णय हा योग्य होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने ऑपरेशन सिंदूरची कारवाई करण्यासाठी लष्कराला पूर्णपणे मुभा दिली होती. त्यामुळे, लष्कर अलर्ट मोडवर असतानाही शस्त्रसंधीचा पर्याय स्वीकारण्याचा निर्णय हा एक युद्धनीतीचा भाग होता. मात्र मोदींवर टीका करण्याची संधी कधी मिळेल याकडे डोळे लावून बसलेल्या काँग्रेस आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांकडून मात्र शस्त्रसंधी का केली, असा सवाल आता विचारायला सुरुवात केली आहे. या विरोधकांना आता देशप्रेमापेक्षा मोदी कधी अडचणीत सापडतील, याची संधी हवी आहे असे दिसते. म्हणूनच त्यांना आता शस्त्रसंधी का केली या विषयावर संसदेचे विशेष अधिवेशन हवे आहे. विरोधकांच्या कोल्हेकुईकडे दुर्लक्ष करत, मोदी यांनी थेट देशवासीयांशी संवाद साधून सगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा सोमवारी रात्री आठ वाजता प्रयत्न केला आहे. भारतीय सैन्याने पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे अड्डे अचूकरीत्या उद्ध्वस्त केले. दहशतवाद्यांनी कल्पनाही केली नव्हती की भारत इतका मोठा निर्णय घेऊ शकेल. जेव्हा राष्ट्र सर्वोच्च असते तेव्हा असे कठोर निर्णय घेतले जातात.ज्यांनी आमच्या बहिणींचे कुंकू पुसले त्याचा बदला भारताने घेतला. ऑपरेशन सिंदूरच्या यशासाठी मी संरक्षण दलांना सलाम करतो. भारतावर जर यापुढे दहशतवादी हल्ला झाला, तर जशास तसं उत्तर दिलं जाणार हे ऑपरेशन सिंदूरमुळे स्पष्ट झालं. आपण सर्वांनी भारताचा संयम व क्षमता या दोन्ही गोष्टी पाहिल्या आहेत. पाकिस्तानचे न्यूक्लिअर ब्लॅकमेल सहन करणार नाही. त्या धमकीच्या आडून दहशतवाद्यांना पोसणाऱ्यांना सोडणार नाही, असा इशारा पंतप्रधान मोदी यांनी पाकिस्तानला दिला आहे. ऑपरेशन सिंदूरमुळे भारतीय सैन्य दलाने आपली ताकद केवळ पाकिस्तानलाच दाखवून दिली नाही, तर सर्व जगाचे भारत काय करतो याकडे डोळे लागले होते. म्हणूनच चीनसारख्या देशानेसुद्धा ऐन वेळेला आपला रंग बदलला. आतंकवाद्यांना आम्ही पसंत करत नाही अशी भूमिका चीनला घ्यावी लागली. एका दगडात अनेक पक्षी या निमित्ताने मारलेले आहेत. ऑपरेशन सिंदूरमुळे जगभरामध्ये भारताची एक प्रतिमा अत्यंत प्रतिष्ठेची करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. भारताला डिवचण्याचे काम केले तर त्याचे काय परिणाम होतात, याची कल्पना आता पाकिस्तानला आली असेल. त्याचे कारण हा पूर्वीचा भारत राहिलेला नाही. यापूर्वी कधीही कडक धोरण हे भारताकडून अवलंबण्यात आलेले नव्हते. देशावर हल्ला झाला तरी निषेध करणे आणि नंतर सामोपचाराच्या चर्चेचे गुऱ्हाळ सुरू ठेवणे हे पूर्वी सरकारच्या काळात चालत होते. मोदी सरकारकडून पहिल्यांदाच सिंधू नदीचा जो काही करार आहे तो करार स्थगित करण्याचा निर्णय घेतला. सिंधू नदीतून जाणारे पाणी सुरुवातीला रोखले. त्यानंतर काश्मीरच्या खोऱ्यामध्ये प्रचंड प्रमाणावर पाऊस झाला आणि पुन्हा हे युद्ध सुरू झाल्यानंतर ते पाणी सोडायला सुरुवात केली त्यामुळे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, पाकिस्तानमध्ये दुष्काळ पाडायचा का पाकिस्तानमध्ये जलप्रलय करायचा हे भारताच्या हातात आहे. हे भारताने या वेळेला दाखवून दिलेले आहे. तरीही आता पाकिस्तानकडून भारताच्या सीमेवर कुरापती करण्याचा प्रयत्न झाला, तर पाकिस्तानला नेस्तनाबूत करण्यासाठी 'शस्त्रसंधी' चा कागदी घोडा आड येणार नाही. शस्त्रसंधी म्हणजे युद्धविराम नव्हे, हे पाकिस्तानने ध्यानात ठेवावे.

# माध्यमिक विद्यालय सिडको वसाहत या विद्यालयाचा 98% निकाल











संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------

अंबिका मित्र मंडळ संचलित, माध्यमिक विद्यालय सिडको वसाहत दौलतनगर, सिडको, नाशिक या विद्यालयाचा सन 2024 - 2025 चा शालांत परीक्षा इ. 10 वी चा 98.00% निकाल लागला आहे. विद्यालयातून
कु. समीक्षा प्रमोद मोरे 85.20% आणि
कु. कावेरी मंगेश हांडे 85.20% या दोघींनी समान गुण मिळऊन प्रथांक क्रमांक पटकाविला तर

**द्वितीय क्रमांक**
कु. जान्हवी भारत ताठे 84.60%

**तृतीय क्रमांक -**
कु. मैत्रय विश्वास बच्छव 84.40%,

**चौथा क्रमांक -**
कु. साक्षी विनायक मुर्तडक 83.40%,

**पाचवा क्रमांक-**
कु. स्वरूप संजय नागरे 82%.

निकालात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थिनींनीच बाजी मारल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सन्माननीय बाळासाहेब पाटील, डॉ. ऋतिका पाटील, व श्री. सचिव संदीप पाटील, नानासाहेब पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन यशवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देऊन त्यांना प्रोत्साहित केले. यावेळी प्रशासन अधिकारी आर. सी. सोनवणे, विद्यालयाचे मुख्याध्याप सतिश भालेराव. शिक्षक श्रीमती. निता पाटील, वसंत राठोड, केशव जगताप, भटू पाटील, श्रीमती. वैशाली खैरनार, तुषार तुपे, सूरज सोनवणे, रमेश अंभोरे, रवी पाटील, स्वप्निल पाटील उपस्थित होते. सर्वांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे शब्दसुमनांनी कौतुक केले आणि सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# मदरशाच्या बेकायदा बांधकामावर कारवाई

जयवंत नामदेव डगळे
कल्याण शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराजदूत

--------------------------

पत्रीपुलाजवळील रहेजा गृहसंकुलातील एका इमारतीलगत असलेल्या मदरशाच्या भागात करण्यात आलेल्या बेकायदा बांधकामावर पालिकेच्या क प्रभागाच्या तोडकाम पथकाने कारवाई केली. याबाबत एका महिला डॉक्टरने तक्रार केली होती. साहाय्यक आयुक्त धनंजय थोरात यांच्या उपस्थितीत रविवारी हे बांधकाम भुईसपाट करण्यात आले. रहेजा गृहसंकुलातील सत्यम इमारतीच्या तळमजल्याला असलेल्या मदरशाच्या भागात एक बेकायदा बांधकाम करण्यात आल्याची तक्रार एका महिला डॉक्टरने पालिकेच्या क प्रभागाकडे केली. ही तक्रार प्राप्त झाल्यानंतर वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे क प्रभागाचे साहाय्यक आयुक्त धनंजय थोरात यांनी पत्रीपुलाजकळील रहेजा गृहसंकुल येथे सत्यम इमारतीलगत झालेल्या बांधकामाची खात्री केली. रहिवास असलेल्या इमारतीच्या तळमजल्याला मदरशाच्या बांधकामात फेरबदल करून हे नव्याने बांधकाम केले असल्याचे लक्षात आल्यावर साहायक आयुक्त थोरात यांनी तोडकाम पथकाला घेऊन रविवारी जेसीबीच्या साहाय्याने मदरशाचे बेकायदा बांधकाम तोडून टाकले. ही कारवाई होत असताना काही काळ या भागात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

# साक्री तालुक्यात सरकारी आदेशाला हरताळ 15 मेपूर्वीच कच्च्या बिलांवर बियाण्यांची विक्री सुरु!

## कृषी विभाग झोपेत की हातात हात? शेतकऱ्यांची फसवणूक सुरुच!

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------



शासनाने स्पष्ट आदेश दिलेले असतानाही, साक्री तालुक्यात काही बियाणे विक्रेते नियमांची पायमल्ली करत १५ मेपूर्वीच बियाण्यांची सर्रास विक्री करत आहेत. विशेष म्हणजे, ही विक्री पक्क्या बिलांशिवाय – म्हणजे फक्त कच्च्या पावत्यांवर – आणि तेही वाढीव दराने केली जात आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्यांची मोठी फसवणूक होत असून, संबंधित कृषी विभाग मात्र हात झटकून बसल्याचे चित्र आहे.

राज्य शासनाने यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना दर्जेदार आणि खात्रीशीर बियाणे मिळावे यासाठी १५ मेनंतरच अधिकृत विक्रीस परवानगी दिली आहे. पण साक्रीतील काही विक्रेत्यांनी या आदेशाला हरताळ फासला आहे. कागदोपत्री काहीच पुरावे न ठेवता, बियाणे विक्रीचे व्यवहार कच्च्या बिलांवर उरकले जात असल्याने शेतकऱ्यांना भविष्यात उद्भवणाऱ्या समस्यांबाबत कुठलीही तक्रार नोंदवता येणार नाही. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, “आम्ही बियाणे घेतो, पण पक्के बिल मिळत नाही. भविष्यात बियाणे उगवलं नाही, तर तक्रार कुठे करायची? ” यामागे कोणाचं वरदहस्त आहे का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

**कृषी विभाग मूग गिळून गप्प का?**

या प्रकाराबाबत तालुका कृषी विभागाकडे वारंवार तक्रारी होऊनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने शंका अधिकच गडद होत आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा राहण्या ऐवजी विभागाकडून अनास्था दिसून येते आहे. या बेकायदेशीर विक्रीविरोधात तालुक्यातील शेतकरी संघटनांनी आता आवाज उठवायला सुरुवात केली असून, तातडीने कारवाई न झाल्यास उग्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. शासनाने नियमावली आखूनही त्याची अंमलबजावणी होत नसेल, तर याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसतो.

**प्रतिनिधीचा सवाल**

**"शेतकऱ्यांसाठी नियम, की विक्रेत्यांसाठी सूट?"**

राज्यातील कृषी व्यवस्थेच्या पारदर्शकतेवर हा प्रकार गालबोट लावणारा आहे. आता सर्वांचे लक्ष आहे – कृषी विभाग जागा होतो की या शेतकरी विरोधी कारस्थानात सामील होतो?

# सुपा एमआयडीसी त भूमिपुत्रांना हक्काचा रोजगार मिळालाच पाहिजे..

## शिवबा संघटनेची उद्योग मंत्री सामंत यांच्याकडे तक्रार

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

पारनेर तालुक्यात सुपा या ठिकाणी औद्योगिक वसाहत आहे या ठिकाणी अनेक बहुराष्ट्रीय व राष्ट्रीय कंपन्या या ठिकाणी आहेत. या ठिकाणी प्रचंड रोजगार निर्माण करण्याची क्षमता असणाऱ्या कंपन्या कार्यरत आहेत या सर्व कंपन्यांना पोषक वातावरण तालुक्यात आहे मात्र कंपन्या मनमानी करत असल्याचे निदर्शनास येत आहे स्थानिक कर्मचाऱ्यांना भूमिपुत्रांना टॅलेंट असूनही कामावर घेत


||जय जिजाऊ|| रजि.नं.-महा.१२७/२०१८ अ.नगर ||जय शिवराय||
शिवबा सोशल फाऊंडेशन अंतर्गत,
शिवबा संघटना
( महाराष्ट्र राज्य )
शि. संघटना संस्थापक /अध्यक्ष - अनिल शिवाजी शेटे

जावक क्र. : दिनांक : / /२०२५

प्रति,
मा. उदयजी सामंत साहेब
उद्योग मंत्री महाराष्ट्र राज्य.

विषय :- सुपा,वाघुंडे येथील MIDC बहुराष्ट्रिय कंपन्यामध्ये स्थनिक भुमिपुत्रना डावलले जात असलेबाबत..

महोदय,
अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील असलेली midc हि स्थानिक भुमिपुत्रानसाठी रोजगराचे एक साधन उपलब्ध होइल हि आशा होती. मात्र अनेक कंपन्या या स्थानिक भुमिपुत्राना काम देत नाहि. काम मागायला गेल्यानंतर स्थनिकाना काम देण्याची पॉलिशी नसल्याने सांगतात त्यामुळे तरुणाना इतरत्र कामासाठि जावे लागते. टॅलेंट असुनहि काम देत नसेल तर हा पारनेर तालुक्यातील तरुणानवर अन्याय नाहि का? कर्नाटक व इतर राज्याने कायदा केलेला आहे कि भुमिपुत्र ना पहिले काम मग इतर व भुमिपुत्र कामगारांची यादि गेट वर लावायची नाहि लावली तर थेट कार्यवाहि करतात मग महाराष्ट्र हा न्याय का नको. शेवटी भुमिपुत्राना प्राधान्य असलेच पाहिजे.
कंपनी ला जागा पारनेरची चालते,विज पारनेरची चालते,पाणी पारनेरचे चालते, मग कामगार का चालत नाहि हा मोठा प्रश्न आहे. मात्र यापुढे हे चालणार नाहि तालुक्यातील तरुण न्याय हक्कासाठि उद्रेक करतील. वेळप्रसंगी रस्त्यावर उतरतील.
म्हणुनच मंत्री महोदय पारनेर च्या बेरोजगार तरुणाना न्याय मिळावा यासाठी आपल्या कार्यालयाच्या माध्यमातुन सर्व कंपन्याना आदेश करावा कि सर्वप्रथम प्राधान्य भुमिपुत्राना दयावे. व तसे न करणार्या कंपन्यावर कार्यवाहि करावी. आपल्या माध्यमातुन हा प्रश्न सुटावा हि शिवबा संघटनेच्या वतीने आपणास हात जोडुन विनंती.

प्रत -
MIDC उपविभागीय कार्यालय,
अहिल्यानगर

shivba sanghatna
www.shivbasanghatna.in
मु.पो.निघोज,ता.पारनेर,जिल्हा.अ.नगर
मो.नं ९८५०२६०४२४

नसल्याच्या तक्रारी येत आहेत त्यामुळे भूमिपुत्रांवर अन्याय होत आहे मात्र यामुळे एक प्रश्न पडतो की कंपन्यांना वीज पाणी जागा या ठिकाणी असणारी चालते मग तालुक्यातील भूमिपुत्रांच वावडे का? मात्र याकडे कोणीही लक्ष देत नाही व भूमिपुत्रांवर अन्याय हा वर्षानुवर्ष सुरू आहे कर्नाटक सरकारने सर्वप्रथम भूमिपुत्रांना रोजगार देण्याबाबत तेथील कंपन्यांना आदेशच दिले आहेत व कंपनीत काम करत असलेल्या भूमिपुत्रांची लिस्ट कंपनीच्या गेटवर लावण्याची सक्ती केली आहे त्याच धर्तीवर आपल्या पारनेर तालुक्यात कामगारांना न्याय मिळालाच पाहिजे या संदर्भात उद्योग मंत्री उदय सामंत साहेब आमदार काशिनाथ जी दाते यांना शिवबा संघटनेच्या वतीने पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

> सुपा एमआयडीसी ऑफिस व एमआयडीसीतील सर्व कंपन्यांना शिवबा संघटना पत्रव्यवहार करणार आहे त्यातूनही प्रश्न न सोडल्यास संघटना तालुक्यातील बेरोजगार युवकांना घेऊन आंदोलन करेल.
>
> **अनिल शेटे**
> **शिवबा संघटना संस्थापक अध्यक्ष**

# कर्मवीर आ.मा. पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची एस. एस. सी.परीक्षेत ऐतिहासिक कामगिरी

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------



पिंपळनेरच्या शैक्षणिक क्षितीजावर कर्मवीर आ. मा पाटिल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने आपल्या उत्कृष्ट निकालाची मोहोर उमटवली आहे. फेब्रुवारी,मार्च २०२५ मध्ये झालेल्या एस.एस.सी. परीक्षेत विद्यालयाने विक्रमी यश संपादन करत एकूण ३२३ विद्यार्थ्यांपैकी ३२० विद्यार्थ्यांना उत्तीर्ण केले आहे, ज्यामुळे विद्यालयाचा निकाल प्रशसनीय ८६.६९ टक्के इतका लागला आहे, हि कामगिरी केवळ विद्यालयासाठीच नव्हे, तर संपूर्ण पिंपळनेर साठी गैरवाची बाब आहे. या अभूतपूर्व यशात विद्यालयाच्या १८ गुणवंत विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवून आपल्या बुद्धिमत्तेची आणि कठोर परिश्रमाची साक्ष दिली आहे. यासोबतच १६१विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण होत आपल्या शैक्षणिक सातत्याचे दर्शन घडवले. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या ९६ विद्यार्थ्यांनी आणि द्वितीय श्रेणीत यश मिळवलेल्या २३ विद्यार्थ्यांनीही आपल्या मेहनतिने विद्यालयाच्या यशात मोलाची भर घातली आहे . या परीक्षेत विद्यालयातील तीन विद्यार्थ्यांनी सर्वोत्तम कामगिरी करत केंद्र आणि विद्यालयात आपले व वर्चस्व सिद्ध केले आहे . कुमारी जैन दिशा ललित हिने ९७ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, तर कुमारी कुमारी गवळी मनीषा संतोष हिने ९४.४०% गुणासह द्वितीय स्थान प्राप्त केले. कुमारी कस्तुरी सुनील आणि कुमारी जाधव अनुष्का संदीप या दोघांनी सन्मान ९४ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक विभागून घेतला, हे त्यांच्यातील तीव्र स्पर्धेचे आणि अभ्यासातील एकाग्रतेचे प्रतीक आहे विद्यार्थ्यांच्या या शानदार कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री आर. एन.शिंदे यांनी गौरवोद्वार काढले उपाध्यक्ष श्री एस व्ही मराठे यांनी विद्यार्थ्यांच्या जिद्दीचे कौतुक केले स्कूल कमिटी चेअरमन श्री एस एच जैन यांनी शिक्षकांच्या अथक प्रयत्नांना सलाम केला. सचिव श्री ए.एस. बिरारीस आणि खजिनदार श्री आर. पी. भामरे यांनी या यशाबद्दल आनंद व्यक्त केला. वसतीगृह कमिटीचे चेअरमन श्री एच आर गांगुर्डे आणि कॉलेज कमिटीचे चेअरमन श्री डि. आर जैन यांनी विद्यार्थ्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. स्कूल कमिटीचे व्हा चेअरमन डॉ. श्री. व्ही.एन.शिंदे आणि संचालक श्री एन.पी भदाने व श्री आर. एस कोठावदे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्वल भविष्याची कामना केली. या यशाच्या शिल्पकारांमध्ये विद्यालयाचे समर्पित प्राचार्य श्री पी.एच.पाटील यांचा मोलाचा वाटा आहे, ज्याच्या कुशल नेतृत्वाखाली विद्यालयाने ही उंची गाठली आहे. वपन मुख्याध्यापिका श्रीमती. बी.पी.कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सतत मार्गदर्शन केले. उपप्राचार्य श्री. एच. जे. जाधव आणि पर्यवेक्षक श्री एस. के. भामरे , श्री वाय आर भामरे व श्री एल एस जैन यांनी विद्यार्थ्यांवर वैयक्तिक लक्ष ठेवून त्यांना यशस्वी होण्यासाठी प्रेरित केले. यासोबतच विद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी एक टीम म्हणून काम करत विद्यार्थ्यांच्या यशात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

कर्मवीर आ.मा.पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने केवळ चांगले विद्यार्थी घडवण्यावरच लक्ष केंद्रित केले नाही,तर त्यांच्यात उत्तम नागरिक बनवण्याचे values रुजवली आहेत. शाळेतील सकारात्मक वातावरण शिक्षकाचे प्रेमळ मार्गदर्शन आणि आधुनिक शिक्षण पद्धतीमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट प्रदर्शन करण्याची संधी मिळाली आहे. या वर्षीच्या निकालाने विद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेला आणखी मजबूत केली आहे आणि भविष्यातही असेच उत्कृष्ट निकाल देण्याची प्रेरणा मिळाली आहे या ऐतिहासिक यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थी त्याचे पालक आणि विद्यालयाचे शिक्षक व कर्मचारी यांचे मनःपूर्वक अभिनंदन विद्यालयाची ही यशोगाथा पिंपळनेरच्या शैक्षणिक इतिहासात नेहमीच सुवर्णाक्षरानी लिहिला जाईल.

# आदर्श माध्यमिक विद्यालय, साक्री येथील विद्यार्थ्यांचे एसएससी परीक्षेत घवघवीत यश

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------



विद्या विकास मंडळ साक्री संचलित आदर्श माध्यमिक विद्यालय, साक्री या शाळेने सन २०२४-२५ च्या इयत्ता दहावीच्या एसएससी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत ९१.३२% निकालाची घवघवीत नोंद केली आहे. एकूण १७३ विद्यार्थ्यांपैकी तब्बल १५८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, यामध्ये २० विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. यावेळी विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे मुलांनी मुलींना मागे टाकत यशाची बाजी मारली आहे. रोहित विकास देवरे याने ९६% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. दुसऱ्या क्रमांकावर विवेक प्रकाश वाघ (९४%) असून, तो जन ग्रामीण पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष श्री. प्रकाश वाघ यांचा सुपुत्र आहे. तर उत्कर्ष सचिन देवरे व कार्तिक दिलीप खैरनार या दोघांनी ९३.८०% गुण मिळवून संयुक्तरित्या तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

या घवघवीत यशानंतर शाळेत आनंदाचे वातावरण आहे. मुख्याध्यापक डी. एन. पाटील व शिक्षकवृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार केला. तसेच संस्थेच्या अध्यक्षा मंगलाताई भामरे पाटील, सचिव आबासाहेब सुरेश पाटील, उपाध्यक्ष भैय्यासाहेब चंद्रजित पाटील, प्राचार्य श्री डी. एन. पाटील, तसेच पर्यवेक्षक एन. के. शिंदे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे योगदान महत्वाचे ठरले असून आदर्श विद्यालयाने गुणवत्तेचा आदर्श पुन्हा एकदा सिद्ध केला आहे.

# दहिवेल येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी.!

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------



साक्री तालुक्यातील दहिवेल येथे सालाबादप्रमाणे आज दि.१४.मे २०२५. रोजी सकाळी १०. वाजता स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती निमित्ताने दहिवेल गावातील शिवशंभू भक्तांनी प्रतिमा पूजन करून जय जिजाऊ,जय शिवराय,जय शंभुराजे अशा घोषणाबाजीचा गजर करत समितीचे कार्यालय रत्नप्रभा ऑटो पार्टस् येथे जल्लोषात जयंती साजरी करण्यात आली. या शुभ कार्यक्रमाप्रसंगी शिवशंभू भक्त कन्हैयालाल माळी यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य बद्दल मनोगत व्यक्त केली धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज म्हणजे स्वराज्याच्या धगधगणारा अग्निकुंड होता. यावेळी दहिवेल गावाचे ज्येष्ठ नागरिक श्री दत्तात्रय बच्छाव यांच्या हस्ते प्रतिमा पूजन केले. तसेच ग्रामविस्तार अधिकारी श्री अशोक बच्छाव लोकनियुक्त सरपंच प्रकाश वळवी,उपसरपंच नंदकुमार महाले, यांनी प्रतिमा पूजन करून पुष्पहार अर्पण केले व श्रीफळ वाढविले. संभाजी महाराज स्मारक समितीचे अध्यक्ष संदिप बच्छाव, दत्तात्रय बच्छाव, योगेश पाटील, पत्रकार संजय बच्छाव, नाना चौधरी, महेंद्र बच्छाव, उमेश बच्छाव, विशाल खैरनार, संजय बच्छाव, जगदीश खैरनार, सागर बच्छाव, अनिकेत मोरे, हरी सोनवणे, महेश बच्छाव, विपुल गुरव, राजेश अहिरे, पंकज बच्छाव सदर कार्यक्रमाचे आयोजन धर्मवीर संभाजी महाराज स्मारक समिती दहिवेल यांच्याकडून करण्यात आले होते.यांच्यासह शंभू भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# या आधुनिक काळात छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास युवा पिढीने अंगीकारावा-गुणवंत एच.मिसलवाड

गोविंद ढगे
लोहा प्रतिनिधी
----------------------



या भारत देशामध्ये, या जगामध्ये मॉ जिजाऊ यांनी दोन छत्रपती घडविले. सोळाव्या शतकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. त्यांच्या निधनानंतर स्वराज्यातील रयतेची संपूर्ण जबाबदारी छत्रपती संभाजी महाराज यांच्यावर पडली, अशा या कठीण परिस्थितीमध्ये छत्रपती संभाजी महाराजांनी आठ बलाढ्य साम्राज्याशी लढा देवून हार ही नाही, माघारही नाही, असे १६५ लढाय्या जिंकून स्वराज्यामधील रयतेचे रक्षण केले, अशा या महान क्रांतीकारी योद्धाचा इतिहास युवा पिढीने अंगीकारून समाजाप्रती-देशाप्रती कार्य करावे, असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री.गुणवंत एच.मिसलवाड यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि.१४ मे २०२५ बुधवार रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता संस्कृत पंडीत, मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती, लेखक, तत्वज्ञानी, अखंड भारताचे आराध्य दैवत श्री छत्रपती संभाजी महाराज यांची ३६८ वी जयंती मोठ्या हर्षोल्हासात साजरी करण्यात आली. या अभिवादन सोहळा कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. सर्व प्रथम आगार व्यवस्थापक मा.श्री.अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना ते आपल्या भाषणात म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराज यांचे कार्य हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पेक्षाही एक पाऊल पुढे होते. मोगल साम्राज्यांचे सैन्य आठ पटीने जास्त असूनही शंभू राजांनी गोव्याचे पोर्तुगीज, डच्च, इंग्रज, मोगल, जंजीऱ्याचे सिद्धी यांना टक्कर दिली, बुलेटप्रुफचा जगात पहिल्यांदा शोध लावला, सोळा भाषा अवगत करून चार ग्रंथ लिहिले, अशा या महान क्रांतीकारी संघर्ष योद्धाचा आपण सर्वांनीच आदर्श घेवून समाजाप्रती-राष्ट्राप्रती कार्य करण्याची ही काळाची गरज आहे, असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ, सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक विष्णू हारकळ, बसस्थानक प्रमुख यासीन हामीद खान, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजीक कार्यकर्ते गुणवंत एच.मिसलवाड, पाळी प्रमुख कैलास वाघमारे, वरिष्ठ लिपीक संतोष ढोले, सौ.वैशाली कोकणे, सुनिता हुंबे, गोविंद तेलंग, कृष्णा पवार, सुरेश फुलारी, शिवचरण मळगे, पवन पाटोळे, शेख अकबर, शेख युनूस यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी रा.प.म. आगारातील कामगार-कर्मचारी, बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साक्री तालुक्यात पावसामुळे कांद्याचे मोठे नुकसान; कांदा उत्पादक संघटनेची सरकारकडे मदतीची मागणी

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
----------------------



साक्री तालुका व पिंपळनेर परिसरात सतत पडणाऱ्या पावसामुळे कांद्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनी काढून झाकून ठेवलेला कांदा पावसाच्या पाण्याखाली गेला असून तो काळपट पडला आहे. तर काहींचा अजून शिल्लक असलेला कांदाही सडून खराब झाला आहे. शेतकऱ्यांना उत्पादन खर्च सुद्धा भरून निघत नाहीये. सध्या कांद्याला कवडीमोल दर मिळत आहे. अशा स्थितीत कृषी अधिकारी फोनही उचलत नाहीत आणि तलाठीसुद्धा पाहणीसाठी येत नाही, अशी शेतकऱ्यांची तक्रार आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेने शेतकऱ्यांना एकरी दीड लाख रुपये नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. संघटनेचे धुळे जिल्हाध्यक्ष श्री. संजय भदाणे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार कार्यालयात निवेदन देण्यात आले. शेतकऱ्यांनी प्रशासनावर गंभीर आरोप करत सांगितले की, कृषी अधिकारी संपर्कात नाहीत, फोन उचलत नाहीत, आणि कार्यालयातही भेटत नाहीत. तलाठी , व कृषीसहायक ही पंचनाम्यासाठी फिरकत नाही. शेतकरी बांधवांच्या म्हणण्यानुसार, कवडीमोल दराने कांदा विकला जात असून, उत्पादन खर्चही भरून निघत नाही. सरकारचे याकडे लक्षच नाही, अशी संतप्त भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. श्री. संजय भदाणे यांनी सांगितले की, तालुका कृषी अधिकाऱ्यांना वेळोवेळी फोन करून भेटण्याचा प्रयत्न केला. मात्र, “ बाहेर फील्डवर आहेत,” असे सांगून टाळाटाळ केली जाते. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांवर चौकशी करून कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली. निवेदन देताना उपस्थित संघटनेचे पदाधिकारी व शेतकरी अनिल भामरे (तालुकाध्यक्ष) गंगाधर शिंदे (जिल्हा युवा अध्यक्ष), संजय बच्छाव (तालुका उपाध्यक्ष), श्री. अविनाश अंबादास पाटील, दिनेश जैन, प्रकाश पाटील, ज्ञानेश्वर पगारे, संदीप देवरे, सुनील राऊत आदींसह अनेक शेतकरी बांधव उपस्थित होते. शेतकऱ्यांचे जीवन वाचवायचे असेल, तर सरकारने त्वरीत मदतीचे पाऊल उचलावे, अशी एकमुखी मागणी करण्यात आली आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समितीतील कांदा व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांची लूट थांबवावी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------

गेल्या अनेक दिवसापासून कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर अवकाळी पावसाचे संकट कोसळत असताना त्यात आता कृषी उत्पन्न बाजार समिती व खाजगी बाजार समितीतील कांदा व्यापाऱ्यांनी अवकाळी पावसाचे निमित्त पुढे करत शेतकऱ्यांची लूट सुरू केली आहे.

सध्या धुळे जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती व खाजगी बाजार समितीतील कांदा व्यापाऱ्यांनी कमी भावात कांदा खरेदी सुरू केली आहे जवळच्याच नाशिक जिल्ह्यात पिंपळगाव, लासलगाव, सटाणा, नामपुर, या ठिकाणी कांद्याला १५ ते १६ रुपये भाव मिळत आहे तर दुसरीकडे धुळे जिल्ह्यातील बाजार समितीमध्ये ७ ते ८ रुपयाने खरेदी केला जात आहे. एवढ्या फरकाने शेतकऱ्यांची लुटमार चालू आहे तरी कृषी उत्पन्न बाजार समितीतील कांदा व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना योग्य तो भाव द्यावा अन्यथा महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेमार्फत आंदोलन करण्यात येईल याची दखल कांदा व्यापाऱ्यांनी घ्यावी.




This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# "राजमाता जिजाऊ वस्तीगृहाचा यशदीप तेजोमय दहावीतील घवघवीत निकालाने सर्वत्र गौरव"

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-----------------------

मुखेड,पंधरा वर्षांपासून सातत्याने शैक्षणिक यशाचे शिखर गाठणाऱ्या मुखेड येथील राजमाता जिजाऊ वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी यंदाही आपली उज्वल परंपरा कायम राखत दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२५मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले निकाल प्रेरणादायी ठरले आहेत. गणेश विजय टापरे या विद्यार्थ्याने तब्बल ९३.६०% गुण मिळवून वस्तीगृहाचा नाव उज्वल केले असून त्याच्यासह अन्य विद्यार्थी देखील उल्लेखनीय यशाच्या शिखरावर पोहोचले आहेत.

प्राप्त गुणांनुसार प्राविण्य प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे:

गणेश विजय टापरे – ९३.६०%
कृष्णा मनोज जायभाये – ९०.२०%




खंडू हनमंत गोंदलवाड – ८८.२०%
गजानन पंडित जाधव – ८८.००%
महेश मारुती वडजे – ८७.४०%
शिवानंद विठ्ठल हिवराळे – ८६.८०%
बजरंग माधव वडजे – ८४.६०%

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना केवळ गुणवत्तापूर्ण शिक्षणच नव्हे, तर संपूर्ण विषयांचे ट्यूशन, अभ्यासातील अडचणींवर सखोल मार्गदर्शन आणि आत्मविश्वास यामुळेच हे यश साध्य करता आले आहे. या यशामागे राजमाता जिजाऊ वस्तीगृहाचे संचालक गंगाधर वसंतराव बिरादार सर यांचे भरीव योगदान असून, त्यांच्या शैक्षणिक दूरदृष्टीमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संधी मिळाली आहे. त्यांच्या अथक परिश्रमामुळे वस्तीगृह आज महाराष्ट्रात प्रेरणादायी मॉडेल ठरत आहे. मुखेड तालुक्यातील शिक्षक, पालक, आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी विद्यार्थ्यांसोबतच बिरादार सर यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील योग्य मार्गदर्शन आणि कष्टाच्या जोरावर मोठं यश संपादन करू शकतात याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे. शिक्षणाने घडते संस्कार, यशाच्या दिशेने ठाम पाऊल - राजमाता जिजाऊ वस्तीगृहाचा दीप तेजोमय झाला.

# शिरूरला दिवसाआड पाणी पुरवठा शिरूर नगर परिषदेचा निर्णय

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------------

शिरुर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यातील पाणीसाठा सध्या अत्यंत कमी प्रमाणात शिल्लक राहिल्याने शिरुर नगरपरिषदेने कठोर पण आवश्यक असा निर्णय घेतला आहे. गुरुवार, दिनांक १५ मे २०२५ पासून शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याचे निवेदन नगरपालिकेने जाहीर केले. सध्या शिरूर शहरात पाणीपुरवठा करणाऱ्या कोल्हापूर बंधाऱ्यातील पाणीसाठा मर्यादित असून,




कुकडी पाटबंधारे विभागाकडे बंधारा पूर्ण क्षमतेने भरून घेण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. मात्र, तोपर्यंत उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर करणे गरजेचे आहे.

**नवीन पाणीपुरवठा वेळापत्रकानुसार**

गुरुवारी पाणीपुरवठा बंद राहील
शुक्रवारी आणि पर्यायी दिवशी पाणीपुरवठा सुरू राहील
अशी एक दिवसाआड पुरवठ्याची व्यवस्था पुढील सूचना होईपर्यंत लागू राहील.
पाण्याचा वापर अत्यंत जपून आणि काटकसरीने करावा
नळधारकांनी नळांना तोट्या बसवाव्यात जेणेकरून पाणी वाया जाणार नाही.
विज मोटारींचा वापर करून अतिरिक्त पाणीसाठा करू नये.
पाणीपुरवठ्यात कोणत्याही तांत्रिक अडचणीमुळे वेळापत्रकात बदल होऊ शकतो, याची नोंद घ्यावी मुख्याधिकारी प्रीतम पाटील यांनी सर्व शिरुरकरांना सहकार्याचे आवाहन केले आहे.

# नाशिकमध्ये वादळी पाऊस झाडांसाठी धोकादायक... 400 झाडे कोसळली

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------

वादळी पावसात शहरात आतापर्यंत तब्बल ४०० वृक्ष कोसळले. या आपत्तीत दोन युवकांचा मृत्यू झाला. पडलेल्या झाडांखाली ४० ते ५० वाहने दबली गेली. फांद्या व पालापाचोळ्याने गटारी तुंबून काही भागात पाण्याचा निचरा होण्यात अडथळे आले. ही स्थिती लक्षात घेऊन महापालिकेने रस्त्यांवरील अतिधोकादायक स्थितीतील झाडे व फांद्या छाटणीचे काम युद्धपातळीवर हाती घेतले आहे. यात पोकळ, वाळलेल्या आणि किडलेल्या झाडांचा मुख्यत्वे समावेश आहे. या कामास गती देण्याकरिता २५ वृक्षांपर्यंतची काढणी वा फांद्या छाटणीचे अधिकार विभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. नऊ दिवसांपासून वादळी वारा आणि मुसळधार पावसाने शहराला झोडपले आहे. या काळात अनेक भागात झाडे, फांद्या उन्मळून पडल्या. सातपूर भागात अशाच घटनेत दोन युवकांना प्राण गमवावे



लागले. मागील महिन्यात गंगापूर रस्त्यावर झाड पडून एका महिलेचा मृत्यू झाला होता. आठवडाभरातील पावसात वेगवेगळ्या भागात सुमारे ४०० झाडे, फांद्या कोसळल्या. त्याखाली ४० ते ५० वाहने दबली गेली. काही ठिकाणी इमारती, वीज तारा, मनपाच्या खांबांचेही नुकसान झाल्याचे उद्यान विभागाचे प्रमुख विवेक भदाणे यांनी सांगितले. फांद्या, पाचोळ्याने पावसाळी गटारी तुंबल्या. काही रस्ते व चौकात पाणी साचून राहण्यामागे ते कारण ठरले. उद्यान विभाग आणि अग्निशमन दलाने प्रथम पडलेली झाडे हटवून रस्ते मोकळे केले. याकरिता काही ठिकाणी मोठी क्रेन व हायड्रोलिक शिडीचा वापर करावा लागला. आता संपूर्ण शहरात रस्त्यालगतची अतिधोकादायक झाडे काढण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. पूर्णत: वाळलेली, किडलेली आणि पोकळ झालेली झाडे प्राधान्याने काढली जातील. हिरवी झाडे काढली जाणार नाहीत, असे भदाणे यांनी स्पष्ट केले. ज्या झाडांच्या फांद्या रस्त्यांवर धोकादायक ठरू शकतात, त्यांची छाटणी केली जाणार आहे. वृक्षांची छाटणी करण्यासाठी विहित प्रक्रिया आहे. वृक्ष प्राधिकरण समितीची मान्यता घ्यावी लागते. पावसाने कोसळलेल्या आपत्तीत या प्रक्रियेस कार्योत्तर मंजुरी घेतली जाणार असल्याचे सांगितले जाते. धोकादायक झाडे, फांद्याची छाटणी करण्यासाठी नशिक मनपाची संपूर्ण यंत्रणा युद्धपातळीवर काम करीत आहे. गुलमोहोरच्या झाडांवर प्रामुख्याने लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. तसेच जी झाडे भार पेलू शकत नाहीत, त्याच्या फांद्याची छाटणी केली जाईल. यापूर्वी २५ वृक्ष आणि फांद्या छाटणीच्या पूर्वपरवानगीसाठी संबंधित विषय मनपा मुख्यालयात येत असे. आता या संदर्भात निर्णयाचे अधिकार विभागीय स्तरवर देण्यात आले आहेत.- करिश्मा नायर (प्रभारी आयुक्त, महानगरपालिका)

# राष्ट्रीय महामार्गांचा मोकळा श्वास; 'लोकसत्ता'तील वृत्ताची दखल घेत महामार्गांवरील कंटेनर वाहने हटवली

**सुनील बाचरे**
**अंबरनाथ प्रतिनिधी**
**दैनिक स्वराज्यदूत**
----------------------

जेएनपीए बंदर आणि उरणला जोडणाऱ्या दोन्ही राष्ट्रीय महामार्गावरील जड कंटेनर वाहने हटविण्यात आली आहेत. त्यामुळे या दोन्ही मार्गांनी मोकळा श्वास घेतला आहे. परिणामी मार्गावरील दुचाकी व लहान वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे. 'लोकसत्ता' मध्ये यासंबंधीचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर प्रशासनाने त्याची दखल घेत कार्यवाही केली. या मार्गावर उभी करण्यात येणाऱ्या जड कंटेनर वाहनांमुळे होणाऱ्या अपघातात अनेकांचा बळी गेला



आहे. या विरोधात उरण मधील सामाजिक संस्थांनी नवी मुंबई वाहतूक विभागाला निवेदन देताच, नवी मुंबई वाहतूक उपायुक्तांनी जेएनपीएमध्ये बैठक घेऊन जड वाहने हटवून मार्ग मोकळे करा अन्यथा कारवाई करू अशी तंबी दिली होती. त्यानंतर उरणच्या वाहतूक विभागाने मुख्य व सेवा मार्गावरील कंटेनर वाहने हटविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे हे मार्ग मोकळे होऊ लागले आहेत. जेएनपीए बंदरातून दररोज १५ हजारापेक्षा अधिक जड कंटेनर वाहने उरणच्या जेएनपीए बंदर ते पळस्पे व जेएनपीए ते आम्रमार्ग नवी मुंबई या दोन्ही राष्ट्रीय महामार्गावरून वाहतूक करीत आहेत. यातील अनेक वाहने बेदरकारपणे वाहतूक करतात. याचा फटका या मार्गावरून प्रवास करणाऱ्या दुचाकी व हलक्या वाहनांना बसतो.

> उरण मधील जासई, भेंडखळ तसेच द्रोणागिरी परिसरातील मार्गावर उभी करण्यात येणारी कंटेनर वाहने हटविण्यात आली आहेत. त्यासाठी मेगा माईकचा वापर करून सूचना दिल्या जात आहेत.
> **अतुल दहिफळे,**
> **पोलीस निरीक्षक,**
> **उरण वाहतूक विभाग**

# एका सूत गिरणीच्या मदतीची 'राजकीय' कथा....

गोविंद ढगे
लोहा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------

सुधाकरराव नाईक ते विद्यमान देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंतच्या अनेक मुख्यमंत्र्यांनी उदारपणे अर्थसाहाय्य केल्यानंतर मुखेड येथील मधुकरराव घाटे मागासवर्गीय सहकारी सूत गिरणीच्या मदतीसाठी आता राज्याच्या अर्थमंत्र्यांना साकडे घालण्यात आले आहे. गेली ३३ वर्षे झाली तरी हा प्रकल्प मार्गी लागू शकलेला नाही आणि पुन्हा मदतीची याचना करण्यात आली आहे. राजकीय अपरिहार्यता म्हणून ही सारी मदत आता पर्यंत सरकारकडून झाली आहे. नांदेड जिल्ह्यातील माजी राज्यमंत्री दिवंगत मधुकर घाटे हे वरील प्रकल्पाचे मुख्य प्रवर्तक होते. १९९२ साली तत्कालीन औरंगाबादेत झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत वरील सूत गिरणीच्या प्रस्तावास शासनाने भागभांडवलासह मान्यता दिली होती. पुढील काळात मधुकररावांचे निधन झाल्यानंतर त्यांचे पुत्र, माजी आमदार अविनाश घाटे हे या गिरणीची सारी सूत्रे आपल्या हाती ठेवून असून अनेक पक्षांतरे करत त्यांनी वरील प्रकल्पासाठी वेळोवेळी निधी आणल्याचे




दिसून येते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गेल्या रविवारच्या नांदेड दौर्यात वरील गिरणीच्या नव्या प्रशासकीय कार्यालयाचे उद्घाटन घाईघाईने करण्यात आले. त्याचवेळी ३३ वर्षे लोटले, तरी वरील प्रकल्प पूर्ण क्षमतेसह उत्पादनाखाली नसल्याची बाब अध्यक्ष अविनाश घाटे यांच्या निवेदनातूनच समोर आली. काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख व अशोक चव्हाण यांच्या कार्यकाळात वरील गिरणीला शासनाने अर्थसाहाय्य केले. पण पृथ्वीराज चव्हाण यांनी मदत केली नाही म्हणून २०१४ साली घाटे यांनी भास्करराव खतगावकर यांच्या माध्यमातून भाजपात प्रवेश केला. नंतर या पक्षाचे आमदार डॉ. तुषार राठोड यांच्या प्रयत्नांमुळे फडणवीस सरकारमधील चंद्रकांतदादा पाटील आणि सुभाष देशमुख या सहकारमंत्र्यांनी वरील गिरणीला १२.६५ कोटींची घसघशीत मदत केली. फडणवीस सरकार गेल्यानंतर घाटे पुन्हा काँग्रेसमध्ये परतले. २०२४ची विधानसभा निवडणूक झाल्यानंतर महायुतीचे सरकार येताच घाटे यांनी आ.चिखलीकरांच्या माध्यमातून 'राष्ट्रवादी'त प्रवेश केला. आता आपल्या या प्रकल्पाला आणखी मदत मिळविण्याचे प्रयत्न त्यांनी आमदार चिखलीकर यांच्या माध्यमातून सुरू केले आहेत. वरील सूत गिरणीची उत्पादन क्षमता २५ हजार२०० स्पिंडल प्रतिदिन आहे; पण सध्या जेमतेम साडेआठ हजार स्पिंडल उत्पादन होत असल्याने हा प्रकल्प तोट्यात असल्याचे सांगण्यात आले. अजित पवार यांनी पश्चिम महाराष्ट्रातील काही अग्रणी सूत गिरण्या पाहिल्या आहेत. वरील सूत गिरणीची एकंदर अवस्था पाहिल्यावर पूर्ण क्षमता वापरा, असा सल्ला त्यांनी घाटे यांना दिला. अविनाश घाटे यांनी राज्य पातळीवरील सत्तेतल्या आणि गिरणीला मदत केलेल्या नेत्यांना आमंत्रित करून यापूर्वी कधीही मोठ्या कार्यक्रमाचा 'घाट' घातला नाही. पण त्यांच्या प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीच्या कोनशिलेवर प्रकल्पाला आजवर कुठलीही मदत न करणार्यांची नावे विराजमान झाल्याचा आरोप भाजपाच्या एका आमदाराने केला. यानिमित्ताने गिरणीची कथा आणि काहींची व्यथाही समोर आली.

> मधुकरराव घाटे मागासवर्गीय सहकारी सूत गिरणीला राज्य शासनाकडून आतापर्यंत २७ कोटी प्राप्त झाले आहेत. संस्थेचे सभासद भागभांडवल ३ कोटी रुपये आहे. उत्पादन कमी असल्यामुळे उत्पन्नही कमी असून संस्थेने नवीन यंत्रसामग्री बसवून पूर्ण क्षमतेचा प्रकल्प राबविण्यासाठी २३ कोटी रूपयांच्या मदतीचा प्रस्ताव शासनाकडे दिला आहे. त्यात अडचणी येत असल्यामुळे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्र्यांना निवेदन देण्यात आले आहे. – **अविनाश घाटे**, अध्यक्ष

# पावसामुळे नाशिक शहरातील पाणी पुरवठा विस्कळीत

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------

शहरात बुधवारी पावसामुळे वीजपुरवठा खंडित झाल्याने काही भागात कमी दाबाने तर, काही ठिकाणी कमी वेळ पाणी पुरवठा झाला. त्यामुळे नागरिकांना अडचणींना तोंड द्यावे लागले. महानगरपालिकेचा पाणीपुरवठा विभाग आणि स्मार्ट सिटी कंपनीमार्फत सध्या पावसाळापूर्व कामे करण्यात येत आहेत. सततच्या पावसामुळे विद्युत प्रवाह बंद होण्यासह इतर काही तांत्रिक



अडचणींमुळे शहरातील काही ठिकाणी पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून बहुतांश भागामध्ये कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. याबाबत महापालिका पाणी पुरवठा विभागाने कुठल्या विभागात पाणी पुरवठा विस्कळीत आहे, याची माहिती दिली. महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाच्या वतीने जलशुध्दीकरण केंद्रांसह विविध जलकुंभांच्या ठिकाणी फ्लो-मीटर बसविण्यासह इतर अनुषंगिक कामे सुरू करण्यात आली आहेत. याशिवाय काही ठिकाणी पाण्याचे वेळापत्रक बदलण्यात येत आहे. परंतु, याची कोणतीही माहिती पाणी पुरवठा विभागाने दिलेली नाही. सलग तिसऱ्या दिवशी शहर परिसरात काही ठिकाणी कमी दाबाने पाणी पुरवठा झाला. याविषयी अधीक्षक अभियंता रवींद्र धारणकर यांनी, पावसामुळे ही आपत्ती ओढावल्याचे सांगितले. दोन ते तीन दिवसांपासून विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने पूर्ण दाबाने पाणी उचलता आले नाही. पाऊस थांबल्यास दोन ते तीन दिवसात पाणी पुरवठा सुरळीत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**शतायुषी हो बाळा..**

**दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....**

आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह

आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७